सिडको
शहरांचे शिल्पकार

# सिडको महागृहनिर्माण योजना
## ऑगस्ट २०२२

## अंतर्गत उपलब्ध ४,१५८ सदनिकांची विक्री



४१५८
कुटुंबांचे
स्वप्न साकार

# माहिती पुस्तिका

ऑनलाइन अर्जाकरिता संकेतस्थळ
https://lottery.cidcoindia.com

ऑनलाईन अर्ज शुभारंभ
१ सप्टेंबर २०२२

अधिक माहितीसाठी मदत दूरध्वनी क्र.: ०२२ ६२७२२२५५

अर्जदारांसाठी माहिती पुस्तिका नोंदणी, योजनेकरिता शुल्क भरणा व सोडतीचे वेळापत्रक वरील संकेतस्थळावर उपलब्ध

अधिक माहितीसाठी संपर्क

व्यवस्थापक-पणन (गृहनिर्माण) यांचे कार्यालय, तिसरा मजला, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४.



**प्रस्तावना**

नवी मुंबई — नियोजनबध्द आणि सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेले एक अत्याधुनिक शहर. मागील ५० वर्षात आपलं शहर म्हणणाऱ्या २० लाख लोकसंख्येला या शहराने आपल्यात सामावून घेतले आहे. निवास, रोजगार, शैक्षणिक, सामाजिक आणि सामुदायिक जीवनाकरीता आवश्यक सर्व सुविधा व संधी येथे उपलब्ध आहेत. सिडको निर्मित १.५० लक्ष सदनिकांबरोबरच खासगी विकासकांनी निर्माण केलेले रहिवासाचे अनेक पर्याय या शहरात उपलब्ध आहेत. नियोजनबध्द अशा नवी मुंबईत रहिवासाचा पर्याय शोधणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

आपले घर देशाच्या आर्थिक राजधानीच्या जुळया शहरात असावे अशी इच्छा असणाऱ्यांची संख्या वाढत आहे. निसर्ग सौंदर्य, विविध जैवसंपत्ती त्याचप्रमाणे अनेक प्रस्तावित महत्वाकांक्षी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकल्पांनी समृध्द असलेल्या नवी मुंबईचे भविष्य उज्वल आहे. याच देखण्या व उज्वल भविष्य असलेल्या शहरात आपले स्वप्नांतील घर असावे अशी इच्छा बाळगणाऱ्या जनतेची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याच अपेक्षांना पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सिडकोतर्फे साकारला जात आहे.

नवी मुंबईतील तळोजा नोडमध्ये सिडकोतर्फे आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ४१५८ सदनिकांची महागृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येत आहे. यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सदनिका प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र अर्जदारांसाठी असतील तर सर्वसाधारण प्रवर्गातील सदनिकांसाठी योजनेतील पात्रतेच्या अटीनुसार अर्जदार अर्ज करु शकतील.

ही संपूर्ण योजना सिडकोतर्फे पूर्णतः ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. डिजीटल माध्यमाचा यथायोग्य उपयोग, पारदर्शकता आणि विना मध्यस्थ प्रक्रीया हाच यामागचा मुख्य उद्देश आहे. या योजनेतील ऑनलाईन अर्ज प्रक्रीया सुलभ आणि सहज आकलनीय आहे, ती समजून घेण्याचे पर्यायही संकेतस्थळावर माहिती, चलचित्रफित यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

इच्छुक अर्जदारांना आपली अचूक माहिती नोंदवून योजनेत सहभागी होण्यासाठी शुभेच्छा! हा प्रकल्प आपल्या आकांक्षाची पूर्तता करेल अशी मला खात्री आहे.

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र (मर्यादित)

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | सिडको लॉटरी सोडतीचे वेळापत्रक | ४ |
| २. | विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील | ५ |
| ३. | पात्रतेच्या अटी | ६ ते ९ |
| ४. | वितरणासाठी सदनिकांची उपलब्धता व अर्ज सादर करण्याची पध्दत | १० ते १३ |
| ५. | सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यपध्दती | १४ ते १६ |
| ६. | संगणकीय सोडतीत यशस्वी झाल्यानंतर अर्जदाराने दाखल करावयाच्या कागदपत्रांचा तपशील | १७ ते १९ |
| ७. | सदनिकांची विक्री किंमत व ती भरणा करावयाच्या अटी व शर्ती | २० ते २२ |
| ८. | सदनिका वितरणाच्या इतर महत्त्वाच्या अटी | २३ ते २७ |
| ९. | अर्जामध्ये लिहावयाचे आरक्षित गटाचे नाव व त्याचे विवरण | २८ ते ३१ |
| १०. | परिशिष्ट-१ : योजनेचा तपशील | ३२ |
| ११. | परिशिष्ट-२ सदनिकांचा तपशील | ३३ |
| १२. | परिशिष्ट-३ : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता आरक्षित सदनिकांचा तपशील | ३४ |
| १३. | परिशिष्ट-३.१ : सर्वसाधारण प्रवर्गाकरीता आरक्षित सदनिकांचा तपशील | ३५ |
| १४. | परिशिष्ट -४ : ऑनलाईन नोंदणी प्रणाली | ३६ |
| १५. | परिशिष्ट-५ : सदनिकेची किंमत | ३७ |
| १६. | योजनेचे नकाशे, अभिन्यास | ३८ ते ४५ |
| १७. | प्रतिज्ञापत्र | ४६ ते ४७ |

## १. सोडतीचे वेळापत्रक

## सिडको सोडत ऑगस्ट – २०२२ चे वेळापत्रक खालीलप्रमाणे

| अ.क्र. | टप्पा | दिनांक | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | सोडतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणे | ३१/०८/२०२२ | बुधवार | |
| २. | ऑनलाईन अर्जासाठी नोंदणी सुरू | ०१/०९/२०२२ | गुरुवार | दुपारी १२.०० वाजता |
| ३. | ऑनलाईन अर्जासाठी नोंदणीची समाप्ती | ०३/१०/२०२२ | सोमवार | रात्री ०८:०० वाजता |
| ४. | सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची सुरूवात | ०१/०९/२०२२ | गुरुवार | दुपारी १२:०० वाजता |
| ५. | सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची समाप्ती | ०४/१०/२०२२ | गुरुवार | रात्री २३:५९ वाजता |
| ६. | ऑनलाईन पेमेंट स्वीकृती सुरुवात | ०१/०९/२०२२ | गुरुवार | दुपारी १२:०० वाजता |
| ७. | ऑनलाईन पेमेंट (NEFT/RTGS) स्वीकृती अंतिम दिनांक | ०७/१०/२०२२ | शुक्रवार | रात्री २३:५९ वाजता |
| ८. | NEFT/RTGS चलन स्वीकृती समाप्ती | ०७/१०/२०२२ | शुक्रवार | सायंकाळी ०५:०० वाजता |
| ९. | सोडतीसाठी स्वीकृत अर्जाच्या प्रारूप यादीची प्रसिध्दी | १४/१०/२०२२ | शुक्रवार | सायंकाळी ५:०० वाजता |
| १०. | सोडतीसाठी स्वीकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिध्दी | १८/१०/२०२२ | मंगळवार | दुपारी ०३:०० वाजता |
| ११. | सोडत (स्थळ–सिडको भवन सभागृह, सातवा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४०० ६१४) | १९/१०/२०२२ | बुधवार | सकाळी ११:०० वाजता |
| १२ | सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे सिडकोच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे | १९/१०/२०२२ | बुधवार | सायंकाळी ६:०० वाजता |

## २ विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील

| अ.क्र. | योजनेचे ठिकाण | सदनिकेचा प्रकार | सदनिकेचा ताबा देण्याचे वर्षे | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|
| १ | सेक्टर—४०, खारघर | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | २० |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | १६५ |
| | | एकूण | | १८५ |
| २ | सेक्टर—१५ कळंबोली | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | ७ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | ४२ |
| | | एकूण | | ४९ |
| ३ | सेक्टर—१२ द्रोणागिरी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | ११८ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | ४२९ |
| | | एकूण | | ५४७ |
| ४ | सेक्टर - २१ तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | २६ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | १२१ |
| | | एकूण | | १४७ |
| ५ | सेक्टर -२२ तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | २३ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | ९७ |
| | | एकूण | | १२० |
| ६ | सेक्टर -२७ तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | ६४ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | ४०४ |
| | | एकूण | | ४६८ |
| ७ | सेक्टर — ३४ तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | मार्च २०२३ पासून | १२२ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | ९५० |
| | | एकूण | | १०७२ |
| ८ | सेक्टर — ३६ तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | मार्च २०२३ पासून | ३ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | १३९१ |
| | | एकूण | | १३९४ |
| ९ | सेक्टर- ३७ तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ताबा देण्यास तयार घरे | २१ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | १५४ |
| | | एकूण | | १७५ |
| सर्व योजनेची एकूण बेरीज | | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | | **४०४** |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | | **३७५४** |
| | | एकूण | | **४१५८** |

# : माहिती पुस्तिका :

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

## ३. पात्रतेच्या अटी

**<u>ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.</u>**

सिडको महामंडळाच्या अखत्यारातील सदनिका विक्रीसाठी, नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम-२००८ यामधील तरतुदी अनुसार व त्या त्या वेळी, त्या त्या अवस्थाप्रत लागू केल्या जाणाऱ्या तरतुदींच्या अधीन राहून इच्छुक अर्जदारांकडून या सदनिकांच्या विक्रीकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**A) सर्वसाधारण अटी (आर्थिक दृष्ट्या दुर्बल गट व सर्वसाधारण प्रवर्गाकरीता)**

i) अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

ii) महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अर्जदाराचे किमान १५ वर्षाचे वास्तव्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करणे आवश्यक राहील.

iii) अर्ज एका व्यक्तीच्या किंवा संयुक्त नावाने करता येईल. संयुक्त अर्जामध्ये सहअर्जदार हा केवळ पती/पत्नी असू शकेल. तसेच अर्जदार अविवाहित असल्यास, सहअर्जदार म्हणून आई असू शकेल. सहअर्जदार यांनी उपरोक्त सर्व पात्रता निकषांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

**B) विशेष अटी**

**१. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांकरीता (पंतप्रधान आवास योजने अंतर्गत) बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी पात्रता निकष :**

१.१. अर्जदार किंवा त्याची पती/पत्नी व त्यांची अज्ञान मुले यांचे नावे संपूर्ण भारतात कुठेही पक्के घर नसावे व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदारांस छाननी प्रक्रियेवेळी सादर करावे लागेल. प्रतिज्ञापत्राचा नमुना माहिती पुस्तिकेच्या शेवटी जोडण्यात आलेला आहे.

१.२. अर्जदाराचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.६,००,०००/- पर्यंत असावे. ‘कौटुंबिक वार्षिक उत्पन्न’ म्हणजे अर्जदाराचे स्वत:चे एकटयाचे व त्यांची पती/पत्नी यांचे वार्षिक उत्पन्न असल्यास दोघांचे मिळून नोकरीव्दारे अथवा उद्दयोगधंद्दयापासून, जीवितार्थाचे योजनेत दिलेल्या वित्तीय वर्षाकरीता पूर्वीच्या सलग १२ महिन्यांचे एकूण उत्पन्न म्हणजे दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या कालावधीत झालेल्या प्राप्तीवरुन परिगणित करण्यात यावे. उत्पन्न या संज्ञेत पगारातील मूळ वेतन व महागाई भत्ता यांचा समावेश राहील. उत्पन्न पुरावा म्हणून अभियोक्ताने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा तहसीलदार यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा आयकर विवरणपत्र सादर करावे.

१.३. जातीचा दाखला आणि जात वैधता प्रमाणपत्र. (लागू असल्यास) तसेच इतर आरक्षित प्रवर्गाकरिताचे प्रमाणपत्र योग्य त्या नमुन्यामध्ये सादर करावे. (लागू असल्यास)

१.४. सदर सदनिका विक्री करारनामा केल्याच्या तारखेपासून पुढील १० वर्षाच्या कालावधीत फेरविक्री/ हस्तांतरण करता येणार नाही. महामंडळाच्या लेखी परवानगीनंतर व लागू असलेल्या हस्तांतरण शुल्काचा भरणा केल्यानंतर, अर्जदार ज्या आरक्षित प्रवर्गातील आहे त्याच समान प्रवर्गात सदनिका  हस्तांतरीत होईल. १० वर्षाच्या कालावधीनंतर अंध किंवा शारीरिक दृष्ट्या अपंग व्यक्ती, राज्य शासकिय कर्मचारी, नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, नवी मुंबईतील माथाडी कामगार व सर्व साधारण गट या प्रवर्गात दिलेल्या सदनिकांची  फेरविक्री/हस्तांतरण कुठल्याही प्रवर्गात करण्यास हस्तांतरण शुल्क भरल्यानंतर सिडकोतर्फे परवानगी मिळू शकेल, परंतु त्यांना नंतरच्या सिडको गृहनिर्माण योजनांमध्ये अर्ज करता येणार नाही.

१.५. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अर्जदारांनी केंद्र शासनाच्या http://pmaymis.gov.in या संकेत स्थळावर अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे व अर्जासोबत नोंदणीचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. तसेच अर्जामध्ये आधार क्रमांक नमूद करणे बंधनकारक राहील. पती/पत्नीचे आधारकार्ड व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदार सदर योजनेत यशस्वी झाल्यानंतर छाननी प्रक्रियेवेळी सादर करावे लागेल.

१.६. अर्जदार कुटुंबात प्रौढ महिला असल्यास सदर महिलेच्या नावाने किंवा सदर महिला व तिचा पती यांच्या संयुक्त नावे अर्ज करण्यात यावा आणि ज्या कुटुंबात प्रौढ महिला सदस्य नाही अशा कुटुंबातीलच पुरूषांच्या नावे अर्ज करता येऊ शकेल.

१.७. सदर योजनेत अर्जदारांची माहिती छाननी प्रक्रियेपूर्वी सिडको तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या संकेतस्थळाच्या सहकार्याने अर्जांची वैधता तपासून अंतिम पात्र अर्जदार ठरविण्यात येतील. चुकीचे /खोटया नावाने करण्यात आलेले अर्ज व असे अर्जदार ज्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ आधीच घेतला आहे ते रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

१.८. आर्थिकदृष्या दुर्बल घटकातील यशस्वी अर्जदारांना खालीलप्रमाणे आर्थिक अनुदान प्राप्तहोईल
केंद्र शासन – रु. १.५० लक्ष
राज्यशासन – रु. १.०० लक्ष

१.९. अनुदानाची रक्कम ही यशस्वी अर्जदारांच्या हप्त्याच्या रक्कमेमध्ये केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झाल्यावर समायोजित करण्यात येईल. केंद्र व राज्य सरकारकडून प्राप्त न झालेली अनुदानाची रक्कम ही यशस्वी अर्जदारांकडून वसूल करण्यात येईल.

## २. सर्वसाधारण प्रवर्गाकरीता बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी पात्रता निकष :

२.१. अर्जदार किंवा त्याची पती/पत्नी त्यांची व अविवाहित मुले यांचे नावे नवी मुंबईत कुठेही पक्के घर नसावे व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदारास सदर योजनेत यशस्वी झाल्यानंतर छाननी प्रक्रियेवेळी सादर करावे लागेल. प्रतिज्ञापत्राचा नमुना माहिती पुस्तिकेच्या शेवटी जोडण्यात आलेला आहे.

२.२. सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उत्पन्नाची अट असणार नाही. तरीही, उत्पन्न पुरावा म्हणून अभियोक्ताने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा तहसीलदार यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा आयकर विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२.३. जातीचा दाखला आणि जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) तसेच इतर आरक्षित प्रवर्गाकरिताचे प्रमाणपत्र योग्य त्या नमुन्यामध्ये सादर करावे. (लागू असल्यास)

२.४. सदर सदनिका विक्री करारनामा केल्याच्या तारखेपासून पुढील ३ (तीन) वर्षाच्या कालावधीकरीता फेरविक्री/हस्तांतरण करता येणार नाही. महामंडळाच्या लेखी परवानगीनंतर व लागू असलेल्या हस्तांतरण शुल्काचा भरणा केल्यानंतर, अर्जदार ज्या आरक्षित प्रवर्गातील आहे त्याच समान प्रवर्गात सदनिका हस्तांतरीत होईल. तसेच तीन वर्षाच्या कालावधीनंतर अंध किंवा शारीरिक दृष्ट्या अपंग व्यक्ती, राज्य शासकिय कर्मचारी, नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, नवी मुंबईतील माथाडी कामगार व सर्व साधारण गट या प्रवर्गात दिलेल्या सदनिकांची फेरविक्री/हस्तांतरण कुठल्याही प्रवर्गात करण्यास हस्तांतरण शुल्क भरल्यानंतर सिडकोतर्फे परवानगी मिळू शकेल, परंतु त्यांना नंतरच्या सिडको गृहनिर्माण योजनांमध्ये अर्ज करता येणार नाही.

## प्रधानमंत्री आवास योजना—संलग्न व्याज अनुदान (Credit Linked Subsidy Scheme)

- केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी दारिद्र निर्मूलन मंत्रालयातर्फे सर्वसाधारण प्रवर्गातील लोकांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत याकरीता जून २०१५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) — सर्वांसाठी घरे अंतर्गत कर्ज संलग्न व्याज अनुदान (सीएलएसएस) या नावाची व्याज अनुदान योजना सुरू केली आहे. त्याकरिता आपण आपल्या बँकेकडे चौकशी करावी.
- लाभधारक किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याचे भारतात कुठेही स्वत:च्या मालकीचे पक्के घर नसावे.
- अर्जदार पती/पत्नी असल्यास दोघांपैकी एक किंवा संयुक्तरित्या दोघेजण हे एकल अनुदानास पात्र असतील.
- लाभधारक कुटुंबास याआधी, केंद्र शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण योजने अंतर्गत मिळणारे केंद्राचे साहाय्य किंवा प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत कोणताही लाभ मिळालेला असू नये.
- लाभधारक कुटूंब म्हणजे पती/पत्नी आणि त्यांची अविवाहीत अपत्ये होय.
- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत अर्जदारांनी केंद्रशासनाच्या http://pmaymis.gov.in या संकेतस्थळावर अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे व अर्जासोबत नोंदणीचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. तसेच अर्जामध्ये आधार क्रमांक नमूद करणे बंधनकारक राहील. पती/पत्नीचे आधारकार्ड व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदार सदर योजनेत यशस्वी झाल्यानंतर छाननी प्रक्रियेवेळी सादर करावे लागेल.

### योजनेचा तपशिल :

| व्याज अनुदान (%) | अनुदानास पात्र असलेली कर्जाची कमाल मर्यादा | मिळणारे कमाल अनुदान (रु.) | मालकी हक्क स्त्रीकडे असावा |
|---|---|---|---|
| ६.५०% | रू. ६,००,००० | २.६७ लाख (अंदाज) | होय |

**व्याप्ती :**

- व्याज अनुदान हे कर्जाचा कालवधी कमाल २० वर्षे असल्यास किंवा कर्जाचा नियोजित कालावधी, यांपैकी कमाल मर्यादेच्या आतील कालावधीस उपलब्ध असेल.
- व्याज अनुदान हे हुडको/एनएचबी /बँक यांच्या मार्फत थेट लाभधारकांच्या बँक खात्यात जमा केले जाईल. जेणेकरुन लाभ धारकांवरील कर्जाचा आणि हप्त्यांचा भार कमी होण्यास मदत होईल. याबाबत थेट संबंधित संस्थांशी संपर्क साधावा.

**सूचना :**येथे देण्यात आलेले निकष हे अर्जदारांच्या पात्रतेचे मूल्यमापन करण्याबाबत आहेत. सीएलएसएस चे लाभ मिळविण्याकरीता अर्जदारांच्या पात्रतेचे मूल्यमापन करण्याचे अधिकार पूर्णत: भारत सरकारचे आहेत व सिडकोचे यांवर कोणतेही नियंत्रण नसून त्याकरिता सिडकोस जबाबदार धरता येणार नाही.

## ४. वितरणासाठी सदनिकांची उपलब्धता व अर्ज सादर करण्याची पध्दत

आर्थिकदृष्टया दुर्बल व सर्वसाधारण गटांकरीता उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील या पुस्तिकेच्या परिशिष्ट – २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे. सदर योजनेत विविध प्रवर्गांकरिता आरक्षण ठेवण्यात आले असून, सदर तपशील पुस्तिकेमधील परिशिष्ट -३ व ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**सोडतीसाठी अर्ज करण्याची व सदनिकेकरिता नोंदणी करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे :**

४.१. सिडको संकेतस्थळावरील https://lottery.cidcoindia.com येथे अर्जदाराने सर्वप्रथम आधार व पॅन क्रमांक टाकून स्वतःची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी. (अर्ज करण्यासाठीची सविस्तर Help File संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे)

४.२. नाव नोंदणीसाठी अर्जदाराने, अर्जामध्ये विहीत केलेली माहिती स्वतः भरणे आवश्यक आहे. तसेच *अशी खुण असलेली माहिती भरणे बंधनकारक आहे, अशी बंधनकारक माहिती व ड्रॉप डाऊन मधील माहीती फक्त इंग्रजीमध्ये उपलब्ध राहील.

४.३. अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी, जेणेकरून अर्ज भरणे सुलभ जाईल.

- i) नाव (पॅनकार्ड प्रमाणे)
- ii) कौटुंबिक उत्पन्न व त्यानुसार पात्र उत्पन्न गट
- iii) आरक्षण प्रवर्ग (अर्जदार एकापेक्षा जास्त प्रवर्ग निवडू शकतो)
- iv) अर्जदार सध्या राहात असलेल्या घराचा संपूर्ण पत्ता व पोस्टाचा पिनकोड क्रमांक
- v) अर्जदाराची जन्मतारीख (पॅनकार्ड प्रमाणे)
- vi) आधार क्रमांक (UID No.) व आधार कार्डची प्रत
- vii) अर्जदाराच्या बँक खात्याचा तपशील ( नंतर कोणताही बदल केला जाणार नाही)
- viii) अर्जदाराच्या स्व:तच्या बचत खात्याचा तपशील जसे, बँकचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा MICR/IFSC क्रमांक दयावा. अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशील देऊन अर्ज करता येणार नाही, असे केल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. तसेच चालू खाते, संयुक्त खाते, एन.आर.आय.खात्याचा तपशील चालणार नाही.
- ix) अर्जदाराचा स्व:तचा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आयडी देणे बंधनकारक आहे.
- x) अर्जदार तसेच त्याची पत्नी/पती (उत्पन्न असल्यास) यांचे दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ या कालावधीतील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न.
- xi) अर्जदाराने अर्जामध्ये त्याचा स्वत:चा PAN क्रमांक देणे बंधनकारक आहे. सदर क्रमांक चुकीचा आढळल्यास अथवा दुसऱ्याचा पॅनकार्ड क्रमांक दिल्याचे आढळल्यास असे अर्ज चुकीची माहिती दिल्यामुळे कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील. पॅन क्रमांकाची ऑनलाईन पडताळणी केली जाईल.

xii) अर्जदाराने स्व:तचे स्कॅन केलेले ५०kb पर्यंतjpeg format मध्ये असलेले ठळक व सुस्पष्ट असलेले छायाचित्र तयार ठेवावे. (ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतेवेळी स्व:तचा फोटो अपलोड करावा.)

xiii) ज्या प्रवर्गात अर्ज केला असेल त्या प्रवर्गाकरिताचे आवश्यक प्रमाणपत्र.

४.४.ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अर्जदाराला त्या खातेद्वारे वेगवेगळया सांकेतात अथवा एकाच सांकेतातील वेगवेगळया पात्र प्रवर्गात अर्ज भरता येईल.

४.५.अर्जदाराने एकदा नोंदणी केल्यानंतर User Name व पासवर्डचा वापर करुन, सदर खात्याचा वापर करता येईल. User Name हा आपल्या ईच्छेप्रमाणे असेल. या योजनेसंदर्भातील सर्व संपर्क व्यवहार / संवाद (communication) हे e-mail व SMS व्दारे करण्यात येणार असल्यामुळे e-mail ID व Mobile No. भरताना काळजी घेणे आवश्यक आहे व दिलेली माहिती बदलू नये.

४.६. **ऑनलाइन अर्ज करणे** : ऑनलाइन अर्ज करतेवेळी अर्जदाराने वर नमूद केलेली सर्व माहिती भरावी. तसेच योग्य त्या ठिकाणी आधारकार्ड, पॅनकार्ड, स्वतःचा फोटो व रद्द केलेला धनादेश यांचे JPEG/JPG फॉरमॅट मधील फोटो अपलोड करावा. त्यानंतर पात्र व योग्य अशा एक किंवा अनेक प्रवर्गाची नोंद करावी व त्यानंतर स्वतःच्या बचत खात्याचा खाते क्रमांक व IFSC कोड भरावा व आपली नोंदणी पूर्ण करावी. आपण संकेतस्थळावर अपलोड केलेल्या धनादेशावरील व नोंदविलेल्या खाते क्रमांकामध्ये कोणतीही तफावत असू नये. ऑनलाईन अर्ज करण्याच्या मुदती व्यतिरिक्त कोणी अर्ज भरला असेल तर असा अर्ज सोडत प्रक्रीयेमध्ये ग्राहय धरला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. अर्ज करताना आपण ज्या उत्पन्न गटाकरीता/प्रवर्गाकरीता पात्र असाल त्या उत्पन्न गटाकरीता असलेल्या संकेताकरीता व प्रवर्गाकरीता अर्ज करावा. (अर्ज करण्यासाठीची सविस्तर माहिती Help File दिलेली आहे.) त्यानंतर अर्जदाराने छापील पावती मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. छापील पावती स्कॅन करुन पाठविण्यापूर्वी, माहिती टाईप करताना चूक झाली असेल तर अर्जदारास अगोदर भरलेला ऑनलाईन अर्ज Edit करुन त्यामध्ये दुरुस्ती करता येते. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी वेळेनंतर अर्जदाराला अर्ज भरण्याची अथवा भरलेल्या अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची संधी राहणार नाही. अर्जदाराने छापील पावती मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. छापील पावती वर अर्ज क्रमांकासमोर दहा अंकी क्रमांक दर्शविला जाईल व हा क्रमांक सोडतीसाठी विचारात घेतला जाणार आहे.

४.७ त्यानंतर अनामत रक्कमेच्या अदायगीसाठी payment विवरणामध्ये योग्य पर्यायाची निवड करुन अनामत रक्कम व अर्ज भरण्या बाबतची प्रक्रिया पूर्ण करावी. (अनामत रक्कम भरण्याच्या पध्दतीची सविस्तर माहिती Help File मध्ये दिलेली आहे.)

४.८ अर्जदाराने ऑनलाईन पेमेंट करताना Internet Banking/ Net Banking, RTGS, NEFT, Credit/Debit Card व्दारे विहित केलेली अनामत रक्कम (आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाकरीता रक्कम रु. ७५,०००/- व सर्वसाधारण प्रवर्गाकरीता रक्कम रु. १,५०,०००/-) अधिक विना परतावा अर्ज शुल्क रु. २८०/- (रु.२५०/- अधिक जीएसटी रु.३०/-) भरणा करावा.

४.९ ऑनलाईन पेमेंट करण्याची पध्दत:

अ. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या प्रविष्ट झाल्यानंतर छापील पावती प्राप्त करावी किंवा जतन करावी. त्याची प्रिंट काढून त्यावर स्वाक्षरी करुन त्यांची ३००kb पर्यंत jpeg format मध्ये स्कॅन करुन payment option वर क्लिक करुन तेथे अपलोड करावे.

ब. अर्जाची प्रिंट घेतल्यानंतर किंवा जतन केल्यानंतर अर्जदाराने MY APPLICATION मध्ये जाऊन पेमेंट करावे.

४.१० अर्जदारास सोडतीपूर्वी अनामत रक्कम भरुन अर्ज कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही. अर्जदाराने अनामत रक्कम Internet Banking/ Net Banking, RTGS, NEFT, Credit/Debit Card व्दारे भरल्यावर जर सदर रक्कम सिडको महामंडळाकडे जमा झालेली नसेल तर अर्जदाराचा अर्ज सोडतीकरिता ग्राहय धरला जाणार नाही.

४.११ अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानुसार पात्र असलेल्या योजनेसाठी अर्ज करू शकेल. तथापी एकापेक्षा जास्त पात्र प्रवर्गाकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक प्रवर्गासाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज भरावा लागेल. जर अर्जदार एकापेक्षा जास्त प्रवर्गातील सोडतीत यशस्वी झाला, तर त्याला कुठल्याही एकाच प्रवर्गाकरीता आपली पसंती द्यावी लागेल. निकाल जाहीर झाल्यानंतर एका महिन्याच्या आत इतर प्रवर्गातील सदनिका cidco.nivarakendra.in या संकेतस्थळावर जाऊन online surrender करणे बंधनकारक राहील.

४.१२ या योजनेत एक प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल. यात प्रत्येक सदनिकांकरिता जास्तीत जास्त १ (म्हणजेच) १:१ इतकी प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

४.१३जे अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी होतील अशा अर्जदारांना सदनिकेकरिताचे इरादापत्र ऑनलाईन पद्धतीने दिले जाईल. त्यानंतर अर्जदारांनी पुढील १५ दिवसांच्या आत ऑनलाईन पध्दतीने सर्व कागदपत्रे अपलोड करुन त्या सर्व कागदपत्रांच्या स्व: साक्षांकित प्रती सिडको निवारा केंद्र (सिडको निवारा केंद्र, टी-२७१, टॉवर नं. १०, 7 वा मजला, सीबीडी बेलापूर रेल्वे संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई— ४०० ६१४) येथे जमा करावीत. जे अर्जदार सिडको निवारा केंद्र येथे दिलेल्या कालावधीत कागदपत्रे जमा करणार नाहीत त्या अर्जदारांनी आरक्षित केलेली सदनिका रद्द करून नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम -२००८ च्या अटी व शर्ती च्या अधीन राहून नोंदणी शुल्काचा परतावा करण्यात येईल.

४.१४ पात्रतेसाठी सादर करावयाच्या कागदपत्रांमध्ये अधिवास प्रमाणपत्र, आरक्षण प्रवर्गातील दाखले/प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, इत्यादी मिळण्यास उशीर लागतो असा अनुभव आहे, त्यामुळे अर्जदारांनी वेळीच सदर प्रमाणपत्र योग्य प्राधिकाऱ्याकडे अर्ज करुन तात्काळ प्राप्त करुन घ्यावेत.

४.१५ यशस्वी अर्जदाराने सादर करावयाच्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे अर्जात नमूद केलेल्या माहितीबाबत सविस्तरपणे छाननी करण्यात येऊन अर्जदाराची पात्रता निश्चित करण्यात येईल.

४.१६ऑनलाईन छाननी प्रक्रीयेनंतर घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत अपात्र अर्जदारांना कळविण्यात येईल आणि, जर अपात्र अर्जदारांना या निर्णयाविरुध्द अपील करावयाचे असल्यास ऑनलाईन पध्दतीने सादर करावे. अर्जदार विहित कालावधीत अपील करण्यास असमर्थ ठरल्यास, सदर दावा आपोआपच रद्द ठरेल. अपिलीय अधिकारी यांचा निर्णय हा अंतिम असेल आणि तो अर्जदारास बंधनकारक असेल.

वरील अटी व्यतिरिक्त सदर योजनेतील सदनिकांसाठी नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम - २००८ च्या अटी व शर्ती संपूर्णपणे (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणासह) लागू राहतील. सोडतीतील यशस्वी अर्जदांराना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत यशस्वी अर्जदाराने सादर करावयाच्या कागदपत्रांची सूची, नमुने व वेळापत्रक माहिती पुस्तिकेतमध्ये सविस्तरपणे देण्यात आली आहे.

## ५. सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यपध्दती

५.१ जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जांची प्रथम पडताळणी करण्यात येईल. यात अर्ज विहित अनामत रक्कमेसह पूर्णपणे भरले आहेत की नाही हे तपासण्यात येईल, अपूर्ण आढळलेले अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील व त्याबाबत अर्जदाराकडून केलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला जाणार नाही. खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज सोडतीमधून बाद करण्यात येतील.

i) एकाच अर्जदाराचे एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज.
ii) एकाच अर्जदाराचे वेगवेगळया उत्पन्न गटामध्ये केलेले अर्ज.
iii) वेगवेगळया अर्जदाराचे एकाच बँकमध्ये एकच खाते क्रमांक.
iv) चुकीचा PAN क्रमांकआढळलेले अर्ज.
v) विहित मुदतीमध्ये अनामत रक्कम नमूद केलेल्या बँकेमध्ये जमा झाले नाहीत असे अर्ज.
vi) ऑनलाईन अर्ज चालु होण्यापुर्वी व मुदत संपल्यानंतर केलेले अर्ज. (ऑनलाईन अर्ज चालू होण्याची व बंद होण्याची वेळ ही SERVER मध्ये असलेली वेळ ग्राह्य धरण्यात येईल.)

५.२ सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांचे अर्ज क्रमांकांची आरक्षण निहाय प्रारुप यादी सिडको महामंडळाच्या https://lottery.cidcoindia.com या अधिकृत संकेतस्थळावर वेळापत्रकानुसार प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत अर्जदारांच्या तक्रारी असतील तर अशा अर्जदारांनी संकेत स्थळावर माहिती प्रसिध्द झाल्यापासून २४ तासात या कार्यालयाकडे निवेदन सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती सिडको महामंडळाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तथापी अर्जदाराने अर्जामध्ये लिहिलेल्या माहितीमध्ये बदल केला जाणार नाही. सोडतीनंतर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे आलेल्या हरकतींची छाननी करुन सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांची अंतिम यादी वरील संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जांची संगणकीय सोडत सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे वेळापत्रकात नमूद केल्यानुसार काढण्यात येईल. तसेच सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in व https://lottery.cidcoindia.com वर प्रसिध्द करण्यात येईल. सोडतीच्या दिनांकाबाबत अर्जदारांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

५.३ संगणकीय सोडत काढताना अर्जदाराच्या अर्जाचा क्रमांक हाच लॉटरी जनरेशन क्रमांक म्हणून गृहीत धरण्यात येईल. सोडतीच्या निकालात त्यांनी त्यांच्या अर्जाचा क्रमांक तपासावा. सोडतीत यशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचे अर्जाचे क्रमांक सिडकोच्या

https://cidco.maharashtra.gov.in व https://lottery.cidcoindia.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५.४ सोडत प्रक्रियेचे विविध टप्पे पुढीलप्रमाणे :

i) प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या अर्जातून स्वतंत्रपणे योजना संकेत क्रमांक निहाय व आरक्षण प्रवर्ग क्रमांक निहाय जाहीर सोडत संगणकाव्दारे काढण्यात येईल.

ii) सोडतीत यशस्वी ठरणाऱ्या अर्जदारांची यादी ही "यशस्वी लाभार्थी यादी" म्हणून समजण्यात येईल.

iii) त्यानंतर, संकेत क्रमांक निहाय व प्रवर्ग निहाय प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी, योजना व प्रवर्ग निहाय अनुक्रमे आपोआप कार्यान्वित होईल व त्यांना इरादापत्र देण्यात येईल.

iv) यशस्वी लाभार्थींच्या यादीतील अर्जदारांची पात्रता निश्चित करण्यासाठी अर्जदारांना अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या पृष्ठर्थ कागदोपत्री सर्व पुरावे इरादापत्रामध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या आत सादर करणे आवश्यक राहिल.

v) यशस्वी अर्जदाराने सादर करावयाच्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे अर्जात नमूद केलेल्या माहितीबाबत सविस्तरपणे छाननी करण्यात येऊन अर्जदाराची पात्रता निश्चित करण्यात येईल.

vi) सोडतीनंतर सर्व यशस्वी लाभार्थी यांना लॉगिनद्वारे सिस्टीम जनरेटेड इरादापत्र पाठविण्यात येईल.

vii) अनामत रक्कम ठेव परत करणे : सदनिका प्राप्त न झालेल्या अर्जदारांना सोडतीच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही व्याजाशिवाय, अनामत रक्कम ठेव परत केली जाईल.

viii) ऑनलाईन छाननी प्रक्रीयेनंतर घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत अपात्र अर्जदारांना कळविण्यात येईल आणि, जर अपात्र अर्जदारांना या निर्णयाविरुध्द अपील करावयाचे असल्यास ते १५ दिवसांच्या आत महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) यांच्याकडे सादर करावे. अर्जदार विहित कालावधीत अपील करण्यास असमर्थ ठरल्यास, सदर दावा आपोआपच रद्द ठरेल. अपिलिय अधिकारी यांचा निर्णय हा अंतिम असेल आणि तो अर्जदारास बंधनकारक असेल.

ix) नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००८ मध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या तरतुदींनुसार सदनिकांचे वाटप करण्यात येईल.

५.५ सोडतीमध्ये अयशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) ऑनलाईन अर्ज शुल्क रु.२८०/- वगळून, Electronic Clearing System (E.C.S)/NEFT व्दारेअर्जदाराच्या बँक खात्यात अदा करण्यात येणार असल्यामुळे अर्जदाराने त्यांच्या अर्जात त्याच्या बँकचे नाव, शाखेचे नाव व पत्ता,बँक खाते क्रमांक व

एम.आय.सी.आर.क्रमांक (९ अंकी) अथवा आय.एफ.एस.सी. क्रमांक यापैकी कोणताही एक क्रमांक अचूकपणे नमूद करावा. ज्या अर्जदारांनी Debit/Credit Card व्दारे अनामत रक्कम जमा केली आहे, अशा अयशस्वी अर्जदारांची व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची अनामत रक्कम सुध्दा त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेल्या बँक खात्यावरच परत करण्यात येईल. जर अर्जदाराची अनामत रक्कम बँक खात्यातील त्रुटीमुळे पाठविणे शक्य झाले नाही तर ज्या मार्गे व जेथून म्हणजे (NEFT/RTGS/Net Banking/Debit/Credit Card) येथेच ती परत करण्यात येईल. अर्जदारांनी चुकीची माहिती दिल्यास होणाऱ्या नुकसानीस सिडको महामंडळ जबाबदार राहणार नाही.

५.६ प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची अनामत रक्कम परत केली तरी सुध्दा त्यांचा प्रतिक्षा यादीवरील हक्क त्या सोडतीपुरता अबाधित राहील.

५.७ दरम्यानच्या काळात यशस्वी लाभार्थी यादीवरील जे अर्जदार सदनिकेच्या वाटपासाठी अपात्र ठरतील, त्यांच्या जागी पात्र अर्जदार उपलब्ध होण्यासाठी प्राधान्य क्रमानुसार प्रतिक्षा यादीवरील अर्जदाराची पात्रता निश्‍चित करण्यासाठी अनामत रक्कम भरणा केल्यानंतर कागदोपत्री पुरावा मागवून अर्जाची छाननी करण्यात येईल. छाननीत जे अर्जदार अपात्र ठरतील त्यांना वरीलप्रमाणे त्यांच्या अपात्रतेबाबतच्या निर्णया विरुध्द अपिल अधिकाऱ्याकडे अभिवेदन करण्याचा हक्क राहिल. अर्जाची छाननी व पात्रता निश्‍चित करण्याची वरील कार्यपध्दती सर्व सदनिकांचे वितरण पूर्ण होईपर्यंत चालू राहिल.

५.८ अर्जदाराला सोडतीमध्ये अर्ज केल्यापासून ते सोडतीपर्यंतची माहिती त्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर, एसएमएस व ई-मेल व्दारे पाठविण्यात येईल. त्यामुळे अचूक मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. दयावा. अर्जदारने अर्ज भरताना दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल बदलू नये.

५.९ अर्जदारांना छपाईमुळे झालेल्या चुकांचा फायदा घेता येणार नाही व याबाबतीत मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचा निर्णय अंतीम असून, तो सर्वांवर बंधनकारक राहील.

## ६. संगणकीय सोडतीत यशस्वी झाल्यानंतर अर्जदाराने दाखल करावयाच्या कागदपत्रांचा तपशील

सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना खालीलप्रमाणे कागदपत्रे पात्रता निश्चित करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने तसेच त्याची प्रत सिडको निवारा केंद्र, टी-२७१, टॉवर नं. १०, ८ मजला, सीबीडी बेलापूर रेल्वे संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ येथे सादर करावी लागतील.

६.१ अर्जदाराने आपले वय अर्ज सादर केल्याच्या दिनांका रोजी १८ वर्षापेक्षा जास्त होते हे सिद्ध करण्यासाठी आधारकार्ड/ जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/जिल्हा शल्य चिकित्सक यांचा दाखला इत्यादी यांची प्रत स्व:प्रमाणित करुन सादर करावी.

६.२ महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, अर्जदाराचे किमान १५ वर्षे सलग वास्तव्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले महाराष्ट्रातील अधिवासाचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करावा. (माजी सैनिक तथा सैन्य दलातील कर्मचारी प्रवर्ग आरक्षण वगळून)

६.३ अर्जदाराचे दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ या कालावधीतील १२ महिन्यांचे सरासरी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न (ज्यात फक्त स्वत: अथवा पती व पत्नी यांच्या उत्पन्नाचा समावेश असेल) सिध्द करणारे प्रमाणपत्र.

**६.३.१ अर्जदार अविवाहित असल्यास,**

अ) अर्जदार नोकरी करीत नसल्यास/व्यावसायिक असल्यास/ स्वयंरोजगार असल्यास/निवृत्तीवेतन धारक असल्यास,

- तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला किंवा
- आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे आयकर विवरणपत्र (वित्तीय वर्षे २०२१-२०२२ आणि मुल्यांकन वर्षे २०२२-२०२३)

ब) अर्जदार नोकरी करीत असल्यास,

- १२ महिन्याचे वेतन चिठ्ठी/ वेतनप्रमाणपत्र – कंपनी लेटर हेड वर किंवा आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे आयकर विवरणपत्र (वित्तीय वर्षे २०२१-२०२२ आणि मुल्यांकन वर्षे २०२२-२०२३)

**६.३.२ अर्जदार विवाहित असल्यास,**

अ) अर्जदार नोकरी करीत नसल्यास/व्यावसायिक असल्यास/ स्वयंरोजगार असल्यास/निवृत्ती वेतन धारक असल्यास

- तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला किंवा

- आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे आयकर विवरणपत्र (वित्तीय वर्षे २०२१-२०२२ आणि मुल्यांकन वर्षे २०२२-२०२३)
- अर्जदार फक्त गृहिणी असल्यास तसे स्वयं घोषणापत्र द्यावे.

ब) अर्जदार नोकरी करीतअसल्यास,

- १२ महिन्याचे वेतन चिठ्ठी/ वेतन प्रमाणपत्र – कंपनी लेटर हेड वर किंवा
- आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे आयकर विवरणपत्र (वित्तीय वर्षे २०२१-२०२२ आणि मुल्यांकन वर्षे २०२२-२०२३)

क) पती/पत्नीचे नोकरी करीत असल्यास, त्यांचे वेतनप्रमाणपत्र / आयकर विवरणप्रत/ वेतनपत्र

ड) पती/पत्नी व्यवसाय करीत असल्यास, त्यांचे तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला किंवा आर्थिक वर्ष २०२१-२२ चे आयकर विवरण पत्र

ई) पती/पत्नी नोकरी करीत नसल्यास, तसे स्वयंघोषणापत्र द्यावे

६.४ अर्जदार किंवा त्याची पती/पत्नी त्यांची अज्ञान मुले यांचे नावे संपूर्ण भारतात कुठेही पक्के घर नसावे व त्याबाबतचे रु. १००/- च्या मुद्रांक शुल्काचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Affidavit) अर्जदार सदर योजनेत यशस्वी झाल्यानंतर छाननी प्रक्रियेवेळी सादर करावे लागेल. प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे - (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी)

६.५ अर्जदार किंवा त्यांची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून नवी मुंबईत घर नसल्याबाबत तसेच यापूर्वी अर्जदाराने त्याचे पत्नी/पती अथवा अज्ञान मुलांच्या नावे सिडकोच्या कोणत्याहीगृहनिर्माण योजनेत लाभ घेतला नसल्याचे रु. १००/-च्या मुद्रांक शुल्काचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Affidavit) अर्जदार सदर योजनेत यशस्वी झाल्यानंतर छाननी प्रक्रियेवेळी सादर करावे लागेल. प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे - (सर्वसाधारण प्रवर्गाकरीता)

६.६ अर्जदाराने ज्या राखीव प्रवर्गात अर्ज केला आहे, त्या प्रर्गात मोडत असल्याबाबत संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेल्या दाखल्याची स्व:प्रमाणित प्रत सादर करावी.

६.७ अर्जदाराने मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असल्यास त्या प्रवर्गात मोडत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून दिलेले जातीचे प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जमाती (DT) या प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांना महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इतर राज्यातील

शासकीय विभागाने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

६.८ यशस्वी अर्जदारा व्यतिरिक्त दुसरी व्यक्ती पडताळणी करिता येत असल्यास त्यांनी सोबत त्याच्या नावे Registered Power of Attorney घेऊन येणे अनिवार्य राहील.

६.९ पात्रतेसाठी सादर करावयाचे कागदपत्रांची यादी/ प्रतिज्ञापत्रे इत्यादीचे नमुने सिडकोच्या https://cidco.nivarakendra.in या संकेत स्थळावर सोडतीनंतर उपलब्ध करुन देण्यात येतील. याबाबतची सूचना यशस्वी ठरलेल्या अर्जदारांना त्यांनी दिलेल्या मोबाईलवर एसएमएस (SMS) व्दारे देण्यात येईल. यशस्वी ठरलेल्या अर्जदारांनी वरील कागदपत्रांचे नमुने सोडतीनंतर प्राप्त करुन घ्यावेत. कागदपत्रांचे नमुने यशस्वी अर्जदारांना स्वतंत्ररित्या पाठविण्यात येणार नाहीत, याची नोंद घावी.

६.१० यशस्वी अर्जदारांची पात्रता ठरविण्यासाठी वर नमुद केलेली कागदपत्रे व त्याअनुषंगाने आवश्यक असलेली इतर कागदपत्रे सुचना पत्रामध्ये कळविल्या नुसार विहित कालावधी मध्ये स्व:त अथवा आपल्या वतीने आपण लेखी प्राधिकृत केलेल्या जबाबदार व्यक्तीसोबत (टपालाने नव्हे) सादर करावी व त्याची पोच (टोकन) घ्यावी. विहित कालावधीत सर्व कागदपत्रे सादर न केल्यामुळे अर्जदारास अपात्र ठरवून अर्ज निकाली काढला जाईल, याची नोंद घ्यावी.

६.११ प्रधानमंत्री आवास योजनेत नोंदणी केलेल्याचे प्रमाणपत्र – केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांसाठी

६.१२ जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेले दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र. (अपंगत्वाची टक्केवारी ही किमान ४०% इतकी असावी)

६.१३ माजी सैनिक प्रवर्ग - जिल्हा सैनिकमंडळाद्वारे दिलेले प्रमाणपत्र

६.१४ DGIPR चे पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र व नमुना – ई

७ माथाडी कामगार असल्याचे प्रमाणपत्र

८ नवी मुंबईतील प्रकल्प ग्रस्त - अवार्ड कॉपी व वंशावळ (नोटरीकरून) किंवा मेट्रो सेंटर यांनी दिलेला प्रकल्पग्रस्ताचा दाखला (PAP Certificate)

९ धार्मिक अल्पसंख्यांक - शपथपत्र नमुना – एफ

१० राज्य सरकारी कर्मचारी प्रवर्ग - नमुना – डी (लेटरहेडवरती, सक्षम अधिकाऱ्याच्या सही व शिक्क्यासहित)

## ७. सदनिकांची विक्री किंमत व ती भरणा करावयाच्या अटी व शर्ती

७.१ योजनेतील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती असून सिडको महामंडळास सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या संख्येत वाढ व घट करण्याचा अंतिम अधिकार राहील.

७.२ सदनिकांकरीता विक्री किंमत भरण्याची पध्दत :

शुल्क भरणा वेळापत्रक :

७.२.१ अनामत रक्कम ठेव वगळता सदनिकेच्या विक्री मुल्याची उर्वरित रक्कम सदनिका धारकाने सहा समान हफ्त्यांमध्ये भरावी. हफ्ता भरण्याच्या तारखा वाटप पत्रामध्ये देण्यात येतील.

७.२.२ हफ्त्यांच्या रक्कमेचे शुल्क व वेळापत्रक वाटपपत्रात देण्यात येईल. वाटपपत्रात देण्यात आलेले संकीर्णशुल्क (Misc.Charges) सदनिकेसाठीच्या शेवटच्या हफ्त्याबरोबर भरण्यात यावे.

७.२.३ सर्वसाधारण सेवा जसे, नळ जोडणी, वीज जोडणी इत्यादींसाठीचे शुल्क सदनिका वाटपित झालेल्या व्यक्तीने आवश्यकतेनुसार स्वतंत्ररित्या भरावे.

७.२.४ आवश्यकता वाटल्यास काही प्रकरणांत व्यवस्थापकीय संचालक, महामंडळाकडून निश्चित करण्यात आलेल्या विलंबित देयक शुल्काचा भरणा केल्यानंतर, हफ्ता भरण्यासाठी ठरविण्यात आलेली मुदत एकूण सहा महिन्यांपर्यंत वाढवू शकतात. सदर मुदत वाढीकरीता अर्जदाराने हफ्ता थकण्यापूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

सध्याचे विलंबित देयक शुल्काचे दर खालीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| ९० दिवसांपर्यंत : | १२% प्रति वर्ष * |
| ९१ दिवस किंवा अधिक दिवसांकरीता : | १६% प्रति वर्ष * |

*(विलंब देयक शुल्काचे दर कोणत्याही पूर्वसूचने शिवाय बदलले जाऊ शकतात).

७.२.५ जो हफ्ता भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे त्यासह विलंब देयक शुल्काची वसुली करण्यात येईल.

७.२.६ एखादा हफ्ता भरला न गेल्यास वाटपित केलेल्या सदनिकेचे वाटप रद्द करण्यात येईल. अशा प्रकारे वाटपित सदनिका रद्द केल्यास संबंधिताकडून भरण्यात आलेली अनामत रक्कम ठेव

संपूर्ण आणि विक्री मुल्यापोटी भरण्यात आलेल्या रक्कमेपैकी १०% रक्कम दंड म्हणून कापण्यात येईल.

७.२.७ अर्जदाराने परतावा प्रक्रियेसाठी शिक्का मारलेल्या पावत्या, वाटपपत्र तसेच सिडकोकडून देण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र यांच्या मूळ प्रती सिडको कार्यालयास परत करणे आवश्यक आहे.

७.२.८ वरीलप्रमाणे वाटपित सदनिका रद्द केल्यास सदर सदनिका प्रतिक्षा यादीतील अर्जदारास वाटपित करुन तिची विल्हेवाट लावण्याचे सर्व अधिकार सिडकोकडे राहतील. तसेच जर अर्जदार एका प्रवर्गाकरिता पात्रता यादी व दुसऱ्या प्रवर्गाकरिता प्रतिक्षायादी वर असल्यास व अर्जदार पात्रता यादीतील सदनिकेकरिताच्या कागदपत्रे पडताळणी अंती पात्र ठरल्यास, सदर अर्जदाराचा दुसऱ्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीवर हक्क राहणार नाही.

७.२.९ ज्या अर्जदारांना १००% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रक्कमी) भरावयाची आहे, असे अर्जदार सिडकोमध्ये एक रक्कमी म्हणजेच १००% रक्कम भरु शकतात.

७.२.१० अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याने अर्जदार अंतिमत: अपात्र ठरला अथवा स्वच्छेने मिळालेली सदनिका वाटपपत्र मिळण्यापूर्वी नाकारल्यास (Surrender) केल्यास, त्याची अनामत रकमेतून रु.१,०००/- अधिक वस्तू व सेवाकर इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन उर्वरीत रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल. तसेच, अर्जदार यांनी कागदपत्रे तपासणी यांनी मंजूर झाल्यानंतर वाटपपत्र देण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. वाटपपत्र दिल्यानंतर सदनिका नाकारण्यास संपूर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

७.२.११अर्जदार किंवा त्याचे पती /पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात /विविध संकेताकांत अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात /विविध संकेताकांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात/एकाच संकेताकांत एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गातमध्ये/संकेताकांमध्ये अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जांसाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज रु. १,०००/- अधिक GST इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन परत करण्यात येईल.

७.२.१२ वित्त संस्थांकडून कर्ज घेण्याची सुविधा :

- वाटपित सदनिकेसाठी विक्री मुल्य भरण्यासाठी संबंधित व्यक्तीस सिडको मान्यता प्राप्त अशा कोणत्याही वित्त संस्थेकडून/बँकेकडून कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध आहे, त्याकरीता प्रशासकीय शुल्क रु. २५०/- अधिक GST म्हणून आकारण्यात येईल.
- सिडको मान्यताप्राप्त वित्त संस्था/बँकांची यादी तसेच कर्ज घेण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र स्वतंत्रपणे दिले जाईल.
- कर्ज मंजूर झाल्यानंतर लगेचच सदनिका प्राप्त व्यक्तीने त्याबाबतचा तपशील आणि संबंधित वित्त संस्था/बँकेकडून देण्यात आलेल्या त्यासंबंधीच्या पत्राची प्रत सिडकोच्या नोंदीसाठी सिडकोकडे सादर करणे आवश्यक आहे.
- तथापि, सदनिका संबंधित वित्त संस्था/बँकेकडे तारण ठेवणे हे सिडकोकडे सदनिकेचे विक्री मुल्य आणि अन्य शुल्क यांचा पूर्ण भरणा करणे याच्या अधीन आहे.
- वाटपित सदनिका रद्द झाल्यास, संपुर्ण अनामत रक्कम तसेच भरलेल्या हफ्त्या/हफ्त्यांवरील १०% रक्कम रद्द केल्यानंतर, काही रक्कम शिल्लक राहत असल्यास ती रक्कम सदनिका प्राप्त व्यक्तीस तिने ज्या वित्त संस्थे/बँकेकडून कर्ज घेतले असेल, ज्या वित्त संस्थेचे/बँकेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच परत करण्यात येईल.
- सदनिका प्राप्त झालेल्या व्यक्तीने हफ्ते भरण्याकरीता वित्त संस्था/बँकेकडून कर्ज घेतल्यास सदनिका वित्त संस्था/बँकेकडे तारण राहील.

# ८. <u>सदनिका वितरणाच्या इतर महत्वाच्या अटी</u>

८.१ सदनिकेचा ताबा संबंधित योजनेस भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर देण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास जास्त वेळ लागल्यास भरलेल्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

८.२ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या गटात अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वाटपपत्र अर्जदार व त्याची पत्नी या दोघांच्या नावे देण्यात येईल.

८.३ सदनिकेची विक्री किंमत तात्पुरती असून ती अंतिम झाल्यानंतर सिडको महामंडळाच्या सदनिकेची अंतिम विक्री किंमत निश्चित करेल. ही बदलेली किंमत जाहिरात केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास ही वाढीव किंमत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. अंतिम विक्री किंमत व जाहिरातीतील विक्री किंमत याचे फरकामुळे जर सदनिकांच्या किमंतीत वाढ झाली तर ती वाढीव रक्कम भरणे लाभार्थीवर बंधनकारक राहील. जे अर्जदार प्रतिक्षा यादीवर असतील ते कागदपत्रे पडताळणीअंती पात्र झाल्यास वाटपपत्र देतेवेळी बदलेल्या वित्तीय वर्षाच्या सिडको नियमाप्रमाणे घराच्या किमंतीमध्ये वाढ होईल याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

८.४ महानगरपालिकेचे / नगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मलनि:सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थीस /सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

८.५ लाभार्थी सदनिका धारकांना Maha RERA च्या तरतुदीनुसार त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करुन ती पंजीकृत करुन घ्यावी लागेल. मंडळाची सर्व रक्कम अदा केल्यानंतर इमारती खालील व इमारती सभोवतीच्या अनुलग्न जमिनीचा भाडेपट्टा व इमारतीच्या मालकीचे अभिहस्तांतरण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे करण्यात येईल. लाभार्थींना सहकारी गृहनिर्माण संस्था Maha RERA च्या तरतुदीनुसार विहित कालावधीमध्ये स्थापन करण्याची कार्यवाही करावी लागेल.

८.६ या माहिती पुस्तिकेत दिलेला तपशील परिपूर्ण नाही, तो फक्त निदर्शक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील.

८.७ वितरीत झालेल्या सदनिकेच्या विक्री किंमतीवर महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्काचा भरणा, अधिक्षक मुद्रांक शुल्क कार्यालय यांचेकडे अदा करावे लागतील. तसेच शासनाच्या धोरणानुसार लाभार्थ्याने विक्री किंमती व्यतीरिक्त वस्तु व सेवा कर (GST) भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

८.८ सदनिकेची विहीत कालावधी पर्यंत विक्री करता येणार नाही. सदनिकेची अनधिकृत विक्री/हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित सदनिका धारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

८.९ यशस्वी व पात्र ठरलेल्या अर्जदारांच्या कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) यांना असून सदरहु अर्जावर नवी मुंबई विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००८ अन्वये कार्यवाही करुन त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांचे वाटपपत्र रद्द करण्यात येईल. त्यावर

अर्जदारास  पंधरा दिवसाच्या आत मा. व्यवस्थापकीय संचालक (सिडको) यांचेकडे अपिल करता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

८.१० शासनाच्या सुधारित धोरणानुसार सदनिकेच्या किंमतीवर लागणारा सेवा कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर सदनिका धारकांना भरावे लागतील.

८.१२ कोणत्याही योजनेतील पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अर्जदाराने त्या योजने करीताची अनामत रक्कम ठेव आणि अर्जासाठीचे शुल्क स्वतंत्ररित्या भरावयाचे आहे. तथापि, अर्जदार एकाच योजनेअंतर्गत समान राखीव प्रवर्गाअंतर्गत एकापेक्षा अधिक अर्ज करु शकणार नाही. तसेच अर्जदार एका किंवा एकापेक्षा अधिक योजनांमध्ये विभिन्न उत्पन्न गटांतर्गत अर्ज करु शकणार नाही. असे केल्याचे आढळल्यास कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय, सोडतीच्या आधीच अशा प्रकारचे अर्ज रद्द केले जातील.

८.१३ विक्री करारनाम्याची अंमलबजावणी आणि ताबा देणे :

i) सदनिकेसाठीचे शुल्क आणि आवश्यक ते संकीर्ण शुल्क पूर्णत: भरल्यानंतर सदनिका प्राप्त व्यक्तीस सोयीच्या तारखेस  विक्री  करारनाम्याच्या अंमलबजावणी करीता आणि सदनिकेचा ताबा देण्याकरीता बोलाविण्यात येईल.

ii) सदनिका प्राप्त व्यक्ती विक्री कराराची अंमलबजावणी करेल आणि ठरलेल्या तारखेस आणि वेळेस सदनिकेचा ताबा घेईल. अपवादात्मक प्रकरणात सदनिकाप्राप्त व्यक्तीच्या विनंतीवरुन, सदनिकाप्राप्त व्यक्तीने ज्या तारखेस विक्री करारनाम्याची अंमलबजावणी करण्याचे ठरले होते त्या तारखेपासूनचे सिडकोने निश्‍चित केलेले देखभाल शुल्क द्यावे या अटीवर, सिडको यासाठीची मुदत जास्तीत जास्त तीन महिन्यांपर्यंत वाढवू शकते.

iii) विक्री कराराच्या अंमलबजावणी करीता आणि सदनिकेच्या ताबाकरीता निश्‍चित करण्यात आलेल्या तारखेपासून सदनिकाधारक गृहनिर्माण संस्थेस /कंपनीस किंवा सिडकोस, गृहनिर्माण संस्था /कंपनी  किंवा सिडकोकडून वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या दरानुसार देखभाल शुल्क आणि अन्य संबंधित शुल्क भरण्यास बांधील असेल.

iv) पाणी पुरवठा, सामायिक दिवे, अग्निरोधक यंत्रणा, सांडपाणी पुर्नवापर प्रकल्प, उदवाहन इ. सामायिक सेवांच्या चाव्या सदनिकाधारकांच्या तात्कालिन समितीकडे असतील.

v) सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना : प्रस्तावित गृहनिर्माण संस्था ही एखाद्या अर्जदारास सदर प्रस्तावितसंस्थेचा सदस्य ठरवून स्थापन करण्यात येईल. प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेने सदनिकांचा ताबा देण्यात आल्यानंतर तात्काळ निबंधक, गृहनिर्माण संस्था यांचेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. गृहनिर्माण संस्थेच्या आवारासहीत संपूर्ण इमारतीची देखभाल आणि देखरेख यांसह पायाभूत सेवा व घरे यांचा ताबा तात्काळ प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेला देण्यात येईल.

**८.१४** इतर अटी व शर्ती :

i) विक्री कराराच्या अंमलबजावणी नंतर आणि सदनिकेचा ताबा मिळाल्यानंतर सदनिकाधारक हे संबंधित गृहनिर्माण संस्थेचे भागधारक (शेअर होल्डर)  बनतील.  विकल्या न गेलेल्या

सदनिकांसाठी सिडको लि. कंपनीची/गृहनिर्माण संस्थेची भागधारक/सदस्य असेल. परंतु भविष्यात जेव्हा या सदनिका ज्या व्यक्तींना विकल्या जातील त्यावेळी सिडकोच्या जागी अशा व्यक्तींना कंपनीचे/गृहनिर्माण संस्थेचे भागधारक/सदस्य म्हणून दाखल केले जाईल. (सदनिका धारकांची नवीन गृहनिर्माण संस्था स्थापन व नोंदणीकृत करण्याचे ठरल्यास, प्रत्येक भागधारक/सदस्यास नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम,२००८ बंधनकारक असेल व सिडकोच्या लेखी स्वरुपातील पूर्वपरवानगी शिवाय तो/ती आपल्या नावे असलेले सोसायटीतील शेअर हस्तांतरीत करु शकणार नाही किंवा त्याला/तिला वाटपित करण्यात आलेल्या सदनिकेबाबत त्रयस्थ व्यक्तीशी व्यवहार करु शकणार नाही तसेच गृहनिर्माण संस्थाही आपल्या भागधारकास/सदस्यास अशा प्रकारचे हस्तांतरण करण्याची परवानगी देऊ शकणार नाही.)

ii) सदनिकेची संयुक्त मालकी : सिडको विक्री कराराच्या अंमलबजावणी करण्यापूर्वी सदनिकाप्राप्त धारकाची आपल्या पतीचे किंवा पत्नीचे नाव वाटपित सदनिकेकरीता संयुक्त मालक म्हणून समाविष्ट करण्याबाबतची विनंती, सदनिकाधारकाने सिडकोस प्रशासकीय शुल्क म्हणून रु. ५,०००/- अधिक GST अदा केल्यावर आणि त्यासाठीची आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यावर मान्य करू शकते.

iii) अर्जदाराच्या नावात बदल करणे : सिडको विक्री कराराच्या अंमलबजावणी करण्यापूर्वी सदनिका प्राप्त धारकाने स्वत:चे, पतीचे किंवा पत्नीचे नाव वाटपित सदनिकेकरीता नावात बदल करणेकरीता अर्ज/विनंती केल्यास, सदनिकाधारकाने सिडकोस प्रशासकीय शुल्क म्हणून रु. ५,०००/- अधिक GST अदा केल्यावर आणि त्यासाठीची आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यावर मान्य करू शकते.

iv) हक्क आणि लाभ यांचे कायदेशीर वारसास हस्तांतरण : लाभार्थी व्यक्ती मृत पावल्यास त्याच्या कायदेशीर वारसाने सिडकोला लगेचच न्यायालयाकडून लाभधारकाच्या नावे ‘मृत व्यक्तीस वाटपित सदनिका’ या संदर्भात देण्यात आलेला वारसदाखला किंवा उत्तराधिकारी प्रमाणपत्र सादर करावे.

v) कंपनी किंवा गृहनिर्माण संस्था / तिचे सदस्य, यापैकी जे कोणी असेल ते, मालमत्ता कर, उपकर, मूल्यनिर्धारित जमीन महसूल किंवा कंपनी किंवा गृहनिर्माण संस्था यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेली जमीन/इमारत किंवा सदनिका धारकांना विकण्यात आलेल्या सदनिका यांचे मूल्यनिर्धारण करुन वेळोवेळी ठरविण्यात आलेला महसूल थेट नवी मुंबई महानगरपालिका / पनवेल महानगरपालिका किंवा शासन यांना देतील आणि सदनिकाधारक हे सर्व स्थानिक शासन संस्था, शासन आणि सिडको लि. यांचे कायदे आणि अधिनियमांचे पालन करण्यास प्रतिबध्द असतील.

vi) सदनिकेचा ताबा दिल्यानंतर इमारत निवास योग्य राहावी याकरीताचा खर्च गृहनिर्माण संस्था करतील आणि संपूर्ण इमारत किंवा इमारतीचा एखादा भाग यांस कोणतेही नुकसान पोहोचणार नाही याकडे लक्ष पुरवतील.

vii) सदनिकाधारक आपल्या सदनिकेमध्ये कोणत्याही प्रकारचा बांधकामविषयक बदल करु शकणार नाही किंवा सदनिकेचा वापर केवळ निवासासाठीच करेल. सदनिका धारकांची कंपनी/ गृहनिर्माण संस्था, यापैकी जे कोणी असेल ते, सदनिकांमध्ये वाढीव बांधकाम / बांधकामविषयक बदल करु शकणार नाही तसेच आपल्या सभासदांनीही तसे करण्याची परवानगी देऊ शकणार नाही असे अनधिकृत बांधकामावर महामंडळाकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८.१५ महामंडळाचे अधिकार :

सदनिका प्राप्त झालेली व्यक्ती सदनिकेसाठीचे विक्री शुल्क आणि सर्व प्रकारचे कर भरण्यास, विक्री कराराची अमंलबजावणी करण्यास आणि ठरलेल्या मुदतीत किंवा त्यासाठीच्या देण्यात आलेल्या वाढीव मुदतीत सदनिकेचा ताबा घेण्यास असमर्थठरल्यास किंवा सदर व्यक्तीने यांपैकी कोणत्याही अटींचा भंग केल्यास सिडको महामंडळास वाटपित सदनिका रद्द करुन पूर्ण नोंदणी शुल्कासह सदनिका रद्द करण्यात आलेल्या तारखेपर्यंत भरण्यात आलेल्या संपुर्ण अनामत रक्कम व हफ्त्या/ हफ्त्यांपैकी १०% रक्कम कपात करण्याचा अधिकार आहे. योग्य ती रक्कम कपात केल्यानंतर, उर्वरित रक्कम असल्यास ती संबंधित व्यक्तीला कोणत्याही व्याजाशिवाय परत केली जाईल. वित्त संस्था/बँकेकडून कर्ज घेतले असल्यास संबंधित वित्त संस्थेचे/बँकेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करुन परतावा योग्य रक्कम संबंधितास परत केली जाईल.

८.१६ सर्वसाधारण सूचना :

i) उपरोल्लेखित अटी, लेआऊट व योजना यांमध्ये बदल करण्याचे वा सुधारणा करण्याचे अधिकार सिडको राखून ठेवत आहे.

ii) सिडको आणि सदनिका प्राप्त व्यक्ती/अर्जदार यांस 'नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००८' मधील संबंधित तरतुदी लागू आहेत. त्यामुळे सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या अटींबाबत कोणतीही विसंगती वा फरक आढळल्यास 'नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम - २००८' मधील तरतुदी ग्राह्य धरल्या जातील.

iii) मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी कोणतेही कारण न देता, या गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत येणारे अर्ज स्विकारणे वा नाकारणे किंवा सर्व योजना किंवा एखादी विशिष्ठ योजना रद्द करण्याचे सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

iv) सदर योजनेतील सदनिकांची किंवा वाणिज्यिक घटकांची विल्हेवाट लावण्याबाबतच्या अटी व शर्तीचा अर्थ लावण्याबाबत किंवा अन्य कोणत्याही विषयाबाबत वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय हा मा.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचा असेल आणि सदर निर्णय सर्व पक्षांस लवादाचा निर्णय म्हणून बंधनकारक असेल.

v) माहिती पुस्तिकेतील अनावधानाने झालेल्या छपाईच्या चुकीचा फायदा अर्जदारास घेता येणार नाही.

**सावधानतेचा इशारा**

सिडको महामंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी/सल्लागार किंवा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी

कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला सिडको जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा सिडकोच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास सिडकोच्या मुख्य दक्षता आधिकारी व महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) यांचे कार्यालयास कळवावे.

मा. मुख्य दक्षता अधिकारी यांचे कार्यालय
६ वा माळा, सिडको भवन
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४
दुरध्वनी क्रमांक: ०२२ - ६७९१-८२८९
संकेतस्थळ: https://cidco.maharashtra.gov.in

अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक :
महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) : टोल फ्री क्रमांक : ०२२६२७२२२५५, १८००२६६१९०९

तक्रार निवारण :
सदर वेब पोर्टलवर अर्जदार नोंदणी, योजनेकरीता अर्ज भरणे, शुल्क भरणा व इतर कोणत्याही प्रकारची समस्या /अडचण असल्यास Contact Us यावर क्लिक करावे व यामधील Raise Complaint वर दिलेल्या Drop down Menu मधील योग्य पर्याय निवडून आपली तक्रार नोंद करावी. सदर तक्रारीचे तत्काळ निरसन करण्यात येऊन याबाबत आपल्याला कळविले जाईल.

## ९. अर्जामध्ये लिहावयाचे आरक्षित गटाचे नाव व त्याचे विवरण

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण |
|---|---|
| सर्व साधारण गट (GP) | खालील आरक्षित गट / प्रवर्ग वगळून प्रस्तूत योजनेतील सदनिका या सर्वसाधारण जनतेसाठी उपलब्ध असतील. |
| अनुसूचित जाती व नवबौध्द (SC) | अनुसूचित जाती (SC) याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ खाली महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्यांना अनुसूचित जाती समजण्यात आलेले आहे अशा जाती , वंश किंवा जमाती यामधील त्यांचा भाग किंवा गट असा आहे. |
| अनुसूचित जमाती (ST) | अनुसूचित जमाती (ST) याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खाली महाराष्ट्र राज्याच्या संबंधात महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही भगात वास्तव्य करून राहणाऱ्या ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात आलेले आहे अशा जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| भटक्या जमाती (NT) | भटक्या जमाती (NT) याचा अर्थ शासनाने तशी मान्यता दिलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| विमुक्त जमाती (DT) | विमुक्त जमाती (DT) शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| राज्य शासनाचे कर्मचारी तसेच राज्य सरकारच्या अधिनिस्त असलेली महामंडळे व अंगीकृत उपक्रमे, स्थानिक स्वराज्य संस्था कर्मचारी, संविधानिक मंडळे इत्यादी अर्ज करू शकतात.(MSEB, MTNL, BSNL, | या प्रवर्गात महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हा परिषद यांचे कर्मचारी हे स्थानिक संस्थाचे कर्मचारी असल्यामुळे या आरक्षण गटाकरीता अर्ज करण्यास पात्र नाहीत. तसेच या प्रवर्गामध्ये राज्य शासनाच्या/राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील अस्थापनेवर नियुक्तीपासूनची ५ वर्षे सेवा झाली आहे |

| | | |
|---|---|---|
| MMRDA, NHAI, MSRDC किंवा महापालिका, महामंडळे, संविधानिक मंडळे, कर्मचारी, शिक्षक, इत्यादी या प्रवर्गात अर्ज करु शकतात. | असे अर्जदार या संवर्गात सदनिका मिळण्यासाठी पात्र ठरतील. | |
| नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार (JR) | पत्रकार या प्रवर्गा मध्ये जे अर्जदार पत्रकारीतेच्या व्यवसायावर अवलंबून आहेत असे व्यक्ती याकरीता महासंचालक, माहिती व जनसंपर्क (DGIPR) यांनी दिलेले प्रमाणपत्र व पत्रकार म्हणून देण्यात आलेले ओळखपत्राची प्रमाणित छायांकित प्रत बंधनकारक आहे.<br><br>१. या गटातील अर्जदार व्यक्ती वर्तमान पत्राच्या आस्थापनेवरील अथवा वर्तमान पत्राशी संबंधित असावी. संपादक, लिडर, रायटर, वृत्त संपादक, वृत्त लेखक,कॉपी टेस्टर, वार्ताहर, व्यंगचित्रकार, वृत्त छायाचित्रकार, मुद्रित तपासणीस, यांचा तसेच जी व्यक्ती नियमितपणे प्रख्यात साप्ताहिक, मासिक, वा पिरीऑडिकल मधील मुक्त पत्रकार यांचा या गटामध्ये समावेश होतो. तथापी खालील व्यक्तींचा पत्रकार या गटामध्ये समावेश होत नाही.<br><br>अ. वृत्तपत्र व्यवस्थापन व प्रशासन विभागातील कर्मचारी.<br>ब. पर्यवेक्षक म्हणून काम करणारे कर्मचारी ज्याची सेवा वृत्तपत्र कार्यालयाशी संबंधित आहे अथवा ज्या कारणासाठी व्यवस्थापन स्वरुपाचे काम करणारे कर्मचारी. | |
| नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त (PAP) | ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी नवी मुंबईमध्ये विविध प्रकल्पासाठी सिडकोने संपादित केलेल्या आहेत अशा व्यक्ती. | |
| अंध किंवा शारीरिक दृष्ट्या अपंग व्यक्ती (PH) | अधंत्व पूर्ण<br><br>(Blindness) | जिल्हा शल्यचिकित्सकांचे |

| | | |
|---|---|---|
| | कमी दृष्टी<br><br>(Low Vision) | प्रमाणपत्र<br><br>किंवा<br><br>संबंधित वैद्दयकिय मंडळाचे प्रमाणपत्र |
| | कुष्ठरोग मुक्त<br><br>(Leprosy cured) | |
| | कर्णबधीर<br><br>(Hearing Impairment) | |
| | अवयवातील कमतरता<br><br>(Locomotor Disability) | |
| | मतिमंदत्व<br><br>(Mental Retardation) | |
| | मनोविकृती<br><br>(Mental illness) | |
| माजी सैनिक/सुरक्षा दलातील कर्मचारी तसेच केंद्रिय पोलिस दलातील कर्मचारी (CRPF, ITBP, BSF, CISF किंवा इतर सुरक्षा दलातील कर्मचारी ) अर्ज करू शकतील. | अ) “माजी सैनिक” याचा अर्थ संघ राज्याच्या सशस्त्र दलातील माजी सदस्य असा आहे. (ज्या व्यक्तीच्या संबंधात सेवा न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर किंवा वाईट चारित्र्यामुळे किंवा दलातून तो निघून गेल्याच्या परिणामी ज्याला काढून टाकण्यात आले असेल किंवा ज्याला अटक केल्याच्या कारणास्तव दलातून काढून टाकण्यात आले आहे अशा माजी सैनिकांचा समावेश या प्रवर्गात होणार नाही )<br>ब) माजी सैनिकावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचा अर्थ विवाह साथीदार,मुलगे,अविवाहीत मुली, वडील असा आहे.<br><br>क) संबंधित संरक्षण प्राधिकरण व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून आवश्यक ती प्रमाणपत्रे | |

| | |
|---|---|
| | मिळवावी लागतील.<br>ड) "माजी सैनिक" वा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील घटक व्यक्ती यांना एकाहून अधिक सदनिकेचा लाभ मिळणार नाही. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ सर्वसाधारण राखीव अभियांत्रिकी सेनेतील कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती योग्य फेरफारासह घेऊ शकतील. |
| माथाडी कामगार | नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीतील नोंदणीकृत माथाडी कामगार |
| धार्मिक अल्पसंख्याक (RM) | केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम १९९२ च्या राजपत्रातील भाग २(क) मध्ये धार्मिक अल्पसंख्याक म्हणून अधिसूचित केलेले (ज्यात मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौध्द,पारसी आणि जैन यांचा समावेश असेल) या प्रवर्गातील अर्जदारांना शाळा सोडल्याचा दाखला सोडतीनंतर सादर करणे बंधनकारक आहे. |

# परिशिष्ट – १

## योजनेचा तपशील

सिडको महामंडळाअतर्गत विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या  सदनिकांची तपशील

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशील गट</th><th>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक</th><th>सर्वसाधारण प्रवर्ग</th></tr>
<tr><td rowspan="9">१</td><td rowspan="9">योजना</td><td colspan="2">सेक्टर–४०, खारघर</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–१५, कळंबोली</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–१२ द्रोणागिरी</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–२१, तळोजा</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–२२, तळोजा</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–२७,तळोजा</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–३४,तळोजा</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–३६,तळोजा</td></tr>
<tr><td colspan="2">सेक्टर–३७, तळोजा</td></tr>
<tr><td>२</td><td>आवश्यक कौटुंबिक वार्षिक उत्पन्न</td><td>रु. ६,००,०००/- पर्यंत</td><td>सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उत्पन्नाची अट असणार नाही.</td></tr>
<tr><td>३</td><td>सदनिकेचे चटई क्षेत्र  (चौ.मी.)</td><td>अंदाजे २५.५६ चौ.मी.</td><td>अंदाजे २९.६० चौ.मी.</td></tr>
<tr><td>४</td><td>सदनिकेचा तपशील</td><td>एक शयनगृह, एक बैठकीची खोली, स्वयंपाकघर व स्नान/प्रसाधनगृह</td><td>एक शयनगृह, एक बैठकीची खोली, स्वयंपाकघर व स्नान/प्रसाधनगृह</td></tr>
</table>

# परिशिष्ट — २

## सदनिकांचा तपशील

सिडको योजनेकरीता उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | योजना सांकेतांक | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | सर्वसाधारण प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | | |
| १ | सेक्टर—४०, खारघर | **२०** | **१६५** |
| २ | सेक्टर—१५, कळंबोली | **७** | **४२** |
| ३ | सेक्टर—१२ द्रोणागिरी | **११८** | **४२९** |
| ४ | सेक्टर—२१, तळोजा | २६ | १२१ |
| ५ | सेक्टर—२२, तळोजा | २३ | ९७ |
| ६ | सेक्टर—२७,तळोजा | ६४ | ४०४ |
| ७ | सेक्टर—३४,तळोजा | १२२ | ९५० |
| ८ | सेक्टर—३६,तळोजा | ३ | १३९१ |
| ९ | सेक्टर—३७, तळोजा | २१ | १५४ |
| **एकूण** | | **४०४** | **३७५३** |

| अ.क्र. | योजना सांकेतांक | महारेरा नोंदणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | सेक्टर—४०, खारघर | P५२००००१७४४८ |
| २ | सेक्टर—१५, कळंबोली | P५२००००१७४३७ |
| ३ | सेक्टर—१२ द्रोणागिरी | P५२००००१७३६५ |
| ४ | सेक्टर—२१, तळोजा | P५२००००१७४३९ |
| ५ | सेक्टर—२२, तळोजा | P५२००००१७४२५ |
| ६ | सेक्टर—२७,तळोजा | P५२००००१७४३८ |
| ७ | सेक्टर—३४,तळोजा | P५२००००२२१७४ |
| ८ | सेक्टर—३६,तळोजा | P५२००००२२१८२/ P५२००००२२१७३ |
| ९ | सेक्टर—३७, तळोजा | P५२००००१७४४७ |

## परिशिष्ट —३

## आरक्षित सदनिकांचे तपशील (आर्थिकदृष्टया दुर्बल घटक)

निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची संख्या दर्शविणारा तक्ता

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | सेक्टर— ४०, खारघर | सेक्टर— १५ कळंबोली | सेक्टर— १२ द्रोणागिरी | सेक्टर - २१ तळोजा | सेक्टर २२ तळोजा | सेक्टर २७ तळोजा | सेक्टर — ३४ तळोजा | सेक्टर — ३६ तळोजा | सेक्टर ३७ तळोजा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण गट (GP) | १० | ६ | ५८ | १२ | १२ | ३२ | ६१ | ३ | ११ |
| अनुसूचित जाती (SC) | २ | १ | १३ | ३ | ३ | ७ | १३ | ० | २ |
| अनुसूचित जमाती(ST) | १ | ० | ७ | २ | १ | ४ | ८ | ० | १ |
| भटक्या जाती (NT) | ० | ० | २ | १ | ० | १ | २ | ० | ० |
| विमुक्त जमाती (DT) | ० | ० | २ | १ | ० | १ | २ | ० | ० |
| राज्य शासनाचे कर्मचारी (SG) | १ | ० | ६ | १ | १ | ३ | ६ | ० | १ |
| नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार (JR) | १ | ० | ३ | १ | १ | २ | ३ | ० | १ |
| नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त (PAP) | १ | ० | ६ | १ | १ | ३ | ६ | ० | १ |
| शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ति किंवा दिव्यांग व्यक्ति (PH) | १ | ० | ६ | १ | १ | ३ | ६ | ० | १ |
| माजी सैनिक/ सुरक्षा दलातील कर्मचारी (EX) | १ | ० | ६ | १ | १ | ३ | ६ | ० | १ |
| माथाडी कामगार (MH) | १ | ० | ६ | १ | १ | ३ | ६ | ० | १ |
| धार्मिक अल्पसंख्याक (RM) | १ | ० | ३ | १ | १ | २ | ३ | ० | १ |

## परिशिष्ट — ३:१
## आरक्षित सदनिकांचे तपशील (सर्वसाधारण प्रवर्ग)

निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची संख्या दर्शविणारा तक्ता

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | सेक्टर— ४०, खारघर | सेक्टर— १५ कळंबोली | सेक्टर— १२ द्रोणागिरी | सेक्टर - २१ तळोजा | सेक्टर २२ तळोजा | सेक्टर २७ तळोजा | सेक्टर — ३४ तळोजा | सेक्टर — ३६ तळोजा | सेक्टर ३७ तळोजा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण गट (GP) | ८५ | १९ | २२३ | ६१ | ५३ | १९४ | ४७३ | ६९८ | ८१ |
| अनुसूचित जाती (SC) | १८ | ५ | ४७ | १३ | ११ | ४४ | १०४ | १५३ | १७ |
| अनुसूचित जमाती(ST) | १० | ३ | २६ | ७ | ५ | ३४ | ५७ | ८३ | ९ |
| भटक्या जाती (NT) | २ | १ | ६ | २ | १ | ६ | १५ | २१ | २ |
| विमुक्त जमाती (DT) | २ | १ | ६ | २ | १ | ६ | १५ | २१ | २ |
| राज्य शासनाचे कर्मचारी (SG) | ८ | २ | १७ | ६ | ४ | २० | ४८ | ६९ | ७ |
| नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार (JR) | ४ | २ | ११ | ३ | २ | १० | २३ | ३५ | ४ |
| नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त (PAP) | ८ | १ | २१ | ६ | ५ | २० | ४८ | ६९ | ७ |
| शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ति किंवा दिव्यांग व्यक्ति (PH) | ८ | २ | २० | ६ | ५ | २० | ४८ | ६९ | ७ |
| माजी सैनिक/ सुरक्षा दलातील कर्मचारी (EX) | ८ | २ | २१ | ६ | ४ | २० | ४८ | ६९ | ७ |
| माथाडी कामगार (MH) | ८ | २ | २१ | ६ | ४ | २० | ४८ | ६९ | ७ |
| धार्मिक अल्पसंख्याक (RM) | ४ | २ | १० | ३ | २ | १० | २३ | ३५ | ४ |

# परिशिष्ट –४ ऑनलाईन नोंदणी प्रणाली

**ऑनलाईन नोंदणी सिस्टीम मध्ये आपले स्वागत आहे.**

ऑनलाईन फॉर्म भरताना खालील ३ बाबी लक्षात घ्याव्यात.

अ. **नोंदणी :**

I. आपण आधीपासून मागील सिडको लॉटरी २०१८ आणि २०१९ साठी वापरकर्त्याची नोंदणी केली असल्यास पुन्हा नोंदणीकरणे आवश्यक नाही.आपल्या मागील वापरकर्त्याचा आयडी आणि संकेतशब्द वापरुन आपण लॉटरीसाठी अर्ज करू शकता

II. नवीन अर्जदार ज्याला सिडकोच्या सोडत जानेवारी – २०२२ या योजनेचा ऑनलाईन फॉर्म भरावयाचा आहे, त्यास प्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करताना अर्जदाराने त्याची प्राथमिक माहिती उदा. अर्जदाराचे नाव, आधारकार्ड, पॅनकार्ड क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, पासपोर्ट आकाराचा फोटो, बँक अकाउंट क्रमांक (रक्कमेचा परतावाकरिता) इत्यादि देणे आवश्यक आहे.

ब. **ऑनलाईन अर्ज भरणे** :

नोंदणीकृत अर्जदार त्याची माहिती उदा. उत्पन्न गट, आरक्षण प्रवर्ग इ. बाबी भरुन ऑनलाईन अर्ज भरु शकतो.अर्जदारऑनलाईन अर्जामध्ये योजनेची सोडतीमध्ये उपलब्ध असलेली विस्तृत माहिती पाहु शकतो व त्यास पाहिजे ती योजना निवडू शकतो, अर्जदाराला प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र फॉर्म भरावा लागेल.

क. **अनामत रक्कम भरणे** :

अर्जदारास अनामत रक्कम भरण्यासाठी दोन स्वतंत्र पर्याय आहे.

I. **डेबीट व क्रेडिट कार्डव्दारे तसेच इंटरनेट बँकिंग व्दारे ऑनलाईन अनामत रक्कम भरणे** : जे अर्जदारऑनलाईन पेमेंटव्दारेअनामत रक्कम भरतील त्यांना त्यांचा अर्ज पध्दतीव्दारेच भरावा लागेल व त्याची एक प्रत जवळ ठेवावी लागेल.

II. **आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी. (NEFT/RTGS) व्दारे ऑनलाईन अनामत रक्कम भरणे**: ज्या अर्जदारांनी (NEFT/RTGS) हया पर्यायाची निवड केली आहे, त्यांनी (NEFT/RTGS) वर क्लिक करावे व Generate Payment Slip ची निर्मिती करावी. सदर चलन ची प्रिंट घ्यावी किंवा डाऊनलोड करुनघ्यावे. चलन वर दिलेली माहिती व्दारे अर्जदाराने अनामत रक्कमेचा भरणा बँकेत करावा.

महत्वाचे :

- कृपया सिडकोच्या वेबसाईटवर (https://lottery.cidcoindia.com) उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका अर्ज भरण्याच्या अगोदर काळजीपुर्वक वाचावी.
- माहितीपुस्तिकेत असल्याप्रमाणे अर्जदाराने आपले कौटुंबिक वार्षिक उत्पन्न बरोबर भरले आहे, याची खात्री करावी. त्याच्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्नानुसार अर्जदाराचे उत्पन्न गट निश्चित केले जाते.
- आपल्याकडे उपलब्ध असलेलाच भ्रमणध्वनी क्र.दयावा कारण यापुढील अर्जदारास आवश्यक ते संभाषण इ. SMS व्दारेच देण्यात येतील.
- अर्जदाराने खात्री करावी की त्याने त्याचा ई-मेल आयडी बरोबर दिला आहे. कारण यापुढील अर्जदाराबरोबरचे संभाषण ई-मेलव्दारेही होईत.
- अर्जदारास त्याचा आधार कार्ड क्रमांक व पॅनकार्ड क्रमांक देणे आवश्यक आहे.
- ऑनलाईन अर्जामध्ये ज्या बाबी * अशा पध्दतीने दर्शविलेल्या आहेत. त्या भरणे अनिवार्य आहे.

# परिशिष्ट — ५
## सदनिकेची किंमत

| अ.क्र. | योजनेचे नांव | प्रकार | चटई क्षेत्र चौ.मी. (अंदाजे) | विक्री किंमत रुपये (अंदाजे) |
|---|---|---|---|---|
| १ | सेक्टर—४०, खारघर | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २२,१४,९०१ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३१,७२,३८८ |
| २ | सेक्टर—१५, कळंबोली | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २२,००,३९८ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३१,३२,२५३ |
| ३ | सेक्टर—१२, द्रोणागिरी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २२,१८,०५९ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३०,१७,६८२ |
| ४ | सेक्टर - २१, तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २१,७१,५५६ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३०,५८,५७८ |
| ५ | सेक्टर- २२, तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २१,७१,५५६ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३०,५८,७५७ |
| ६ | सेक्टर — २७, तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २२,३१,०१० |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३१,१२,७८६ |
| ७ | सेक्टर — ३४, तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.५६ | २३,५९,६२३ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.६ | ३४,४०,७१६ |
| ८ | सेक्टर — ३६, तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.५६ | २३,५९,६२३ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.६ | ३४,४०,७१६ |
| ९ | सेक्टर - ३७, तळोजा | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | २५.८१ | २१,७१,५५६ |
| | | सर्वसाधारण प्रवर्ग | २९.८२ | ३०,५८,५७८ |


**टिप् :** वरील सदनिकेच्या विक्री किंमती या तात्पुरत्या स्वरुपात असून, वाटपपत्र निर्गमित करतेवेळेस बदल होण्याची शक्यता आहे.

# योजनांचे नकाशे, अभिन्यास़

## GENERAL TYPICAL UNIT PLAN


CIDCO
WE MAKE CITIES

**MASS HOUSING SCHEME AT TALOJA SITES, NAVI MUMBAI**




**TYPICAL UNIT PLAN**
**FOR TEN NO -01 TO 12**

| CARPET AREA |
| --- |
| 29.60SQ MT (318.614SQ FT ) |



**TYPICAL 1ST TO 7TH,9TH,11TH,13TH,15TH, 17TH, 19TH,21TH & 22TH FLOOR PLAN (RESI.)**



**FRONT ELEVATION**

5

All dimensions are from unfinished to unfinished surface i.e. without plaster and as built dimensions are likely to vary marginally.
All dimensions are in MM.

# GENERAL TYPICAL UNIT PLAN


MASS HOUSING SCHEME AT TALOJA SITES, NAVI MUMBAI




TYPICAL UNIT PLAN
FOR TEN NO – 01, 02, 05 & 06

(FOR DIFFERENTLY ABLED PEOPLE)

| CARPET AREA |
|---|
| 29.82 SQ MT (320.98 SQ FT ) |



GROUND FLOOR PLAN (RESI.)



3D VIEW

33

All dimensions are from unfinished to unfinished surface i.e. without plaster and as built dimensions are likely to vary marginally.
All dimensions are in MM.


CIDCO
WE MAKE CITIES

**MASS HOUSING SCHEME AT TALOJA SITES, NAVI MUMBAI**




**TYPICAL UNIT PLAN**
**FOR TEN NO – 03 & 04**

| CARPET AREA |
|---|
| 29.82 SQ MT (320.98 SQ FT ) |



**GROUND FLOOR PLAN (RESI.)**



**3D VIEW**

34


All dimensions are from unfinished to unfinished surface i.e. without plaster and as built dimensions are likely to vary marginally.
All dimensions are in MM.

**१) सेक्टर-३४ भूखंड क्र. १ वरील आकृती सेक्टर-३४ भूखंड क्र. ६, सेक्टर-३६, भूखंड क्र. १ व २ साठी सारखे आहेत.**

# EWS (TYPICAL UNIT PLAN)


CIDCO
WE MAKE CITIES

**MASS HOUSING SCHEME AT TALOJA SITES, NAVI MUMBAI**





TYPICAL UNIT PLAN
FOR TEN. NO.- 04 & 05

| CARPET AREA |
|---|
| 25.61 SQ MT ( 275.67SQ FT ) |



EWS – ( G+14 ) GROUND FLOOR PLAN (R)
FOR TEN. NO.-04 & 05




FRONT ELEVATION

All dimensions are from unfinished to unfinished surface i.e. without plaster and as built dimensions are likely to vary marginally.
All dimensions are in Meter.


16

## MASS HOUSING SCHEME AT TALOJA SITES, NAVI MUMBAI




**TYPICAL UNIT PLAN**
**FOR TEN NO – 01 TO 06**

| CARPET AREA |
| --- |
| 25.81 SQ MT (277.82 SQ FT ) |



**TYPICAL 1$^{ST}$ TO 7$^{TH}$ FLOOR PLAN**



**3D VIEW**


All dimensions are from unfinished to unfinished surface i.e. without plaster and as built dimensions are likely to vary marginally.
All dimensions are in MM.

# EWS(TYPICAL UNIT PLAN)

**MASS HOUSING SCHEME AT TALOJA SITES, NAVI MUMBAI**




**TYPICAL UNIT PLAN**
**FOR TEN NO – 01, 02, 05 & 06**



**EWS – ( G+14 ) GROUND FLOOR PLAN (R)**

**(FOR DIFFERENTLY ABLED PEOPLE)**


| CARPET AREA |
| --- |
| 25.81 SQ MT (277.82 SQ FT ) |



**3D VIEW**

All dimensions are from unfinished to unfinished surface i.e. without plaster and as built dimensions are likely to vary marginally.
All dimensions are in MM.


44




**(तळमजला + १४ मजले)**

**२) सेक्टर-३४ भूखंड क्र. १ (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक). वरील आकृती सेक्टर-३४ भूखंड क्र. ६, सेक्टर-३६, भूखंड क्र. १ व २ (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) साठी सारखे आहेत.**

Location of Affordable Housing in Sector-21,22,27 & 29 at Taloja Nod



# नमुना

**(केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक अर्जदारांकरीता : नमूना प्रतिज्ञापत्र)**

**(रु.200/- मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी करून)** (Non-Judicial Stamp Paper)

**फोटो**

## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही अर्जदार श्री./श्रीमती.__________________वय ________ वर्षे, अर्ज क्र. _______________ सिडको महागृहनिर्माण योजनेमधील यशस्वी अर्जदार असून मला योजना सांकेतांक क्र. ______________________ व इमारत क्र. ________________ सदनिका क्र. ______________ चे इरादापत्र मिळालेले आहे.

मी/आम्ही अर्ज क्र. _______________ दिनांक___________ रोजी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळणेकरीता सादर केला आहे.

माझ्या / आमच्या परिवारात खालील नमूद प्रमाणे सदस्य आहेत.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| | | |
| | | |

मी/आम्ही पुढे असेही लिहून देतो की, माझे/आमचे व माझ्या/आमच्या वर उपरोक्त नमूद केलेल्या परिवारातील सदस्यांच्या मालकीचे भारतात कुठेही पक्के घर नाही. तसेच माझे आर्थिक वर्ष २०२१ – २२ करिता सर्व मार्गांनी मिळून वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. ६,००,०००/- पर्यंत आहे.

मी/आम्ही पुढे असेही लिहून देतो की, वर नमूद केलेली माहिती ही खरी व बरोबर आहे.

मी/आम्ही पुढे असे कथन करतो की, वर दिलेली माहिती भविष्यात जर चुकीची आढळल्यास होणाऱ्या कोणत्याही कारवाईस मी/आम्ही त्यास जबाबदार राहू, झालेल्या नुकसानीस किंवा इतर बाबींकरीता सिडको महामंडळास कोणत्याही प्रकारची तोशीष लागू देणार नाही.

मी/आम्ही पुढे असे नमूद करते/करतो की, जर उपरोक्त नमूद माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास वाटप केलेले घर रद्द करण्यास माझी / आमची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

मी असे जाहीर करतो/करते की, मी सदर योजना समजून घेतली असून, सिडकोचे त्यासंबंधातील सर्व नियम/अटी मला बंधनकारक राहतील.

अर्जदाराची सही/अंगठा

दिनांक:

नोटरी यांची सही/ शिक्का

ठिकाण:

(हे प्रतिज्ञापत्र यशस्वी लाभार्थ्यांनी इरादापत्रा मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांसोबतअर्जाच्या छाननी प्रक्रीयेवेळी सादर करणे जरुरी आहे.)

# नमुना

**(केवळ सर्वसाधारण प्रवर्ग अर्जदारांकरीता : नमूना प्रतिज्ञापत्र)**

**(रु.200/- मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी करून)** (Non-Judicial Stamp Paper)

| फोटो |
|---|

## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही अर्जदार श्री./श्रीमती.__________________वय ________ वर्षे, अर्ज क्र. ________________ सिडको गृहनिर्माण योजने मधील यशस्वी अर्जदार असून मला योजना सांकेतांक क्र. _______________________ व इमारत क्र. _________________ सदनिका क्र. ______________ चे इरादापत्र मिळालेले आहे.

मी _____________(अस्थापनेचे नांव) नोकरी करीत असून, या विभागात _____________ कार्यरत आहे. माझे आर्थिक वर्ष २०२१—२०२२ करिता सर्व मार्गांनी मिळून वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. ६,००,००१/- पेक्षा अधिक आहे.

मी असे जाहीर करतो/करते की, माझे अथवा माझ्या पती/ पत्नी च्या नावे नवी मुंबईत कुठेही घर नाही. तसेच मी अथवा माझी पत्नी/पती कोणत्याही नवी मुंबई सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद नाही.

मी/आम्ही पुढे असेही लिहून देतो की, वर नमूद केलेली माहिती ही खरी व बरोबर आहे.

मी असे जाहीर करतो/करते की, मी सर्वसाधारण /अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/भटक्या जमाती /विमुक्त जमाती/ अंध किंवा शारिरीक दृष्टया विकलांग व्यक्ती या प्रवर्गातील आहे. (यापैकी योग्य ती नमूद करावे)

मी/आम्ही पुढे असे कथन करतो की, वर दिलेली माहिती भविष्यात जर चुकीची आढळल्यास होणाऱ्या कोणत्याही कारवाईस मी/आम्ही त्यास जबाबदार राहू व सिडको महामंडळास कोणत्याही प्रकारची तोशीस लागू देणार नाही.

मी/आम्ही पुढे असे नमूद करतो/करते की, जर उपरोक्त नमूद माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास इरादित/वाटप केलेले घर रद्द करण्यास माझी / आमची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

मी असे जाहीर करतो/करते की, मी सदर योजना समजून घेतली असून, सिडकोचे त्या संबंधातील नियम/अटी मला बंधनकारक राहतील.

| अर्जदाराची सही/अंगठा |
|---|

दिनांक:

| नोटरी यांची सही/ शिक्का |
|---|

ठिकाण:

(हे प्रतिज्ञापत्र यशस्वी लाभार्थ्यांनी इरादापत्रा मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांसोबतअर्जाच्या छाननी प्रक्रीयेवेळी सादर करणे जरुरी आहे.)